REGISTERED No. B. 3434




# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १६ पुणें. बुधवार तारीख २२ फेब्रुवारी, १९५० अंक ८

स्थापना १९३६

## युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा

*पॅलेस स्ट्रीट, सातारा.*

शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नाशिक व बार्शी.

ता. ३१-१२-४८ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ५,००,००० |
| रिझर्व व इतर फंड्स | रु. | १,३१,००० |
| ठवी | रु. | ७१,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ८९,००,००० |

मुदत ठवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष | दोन वर्षं | तीन अगर अधिक वर्षें |
|---|---|---|
| रु. १-८-० | रु. २-११-० | ३ रुपये |

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १-८-० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | ,, | २-०-० |
| चालू डिपॉझिट | ,, | ०-८-० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.
वा. ग. चिरमुले, बी. ए., एलएल. बी., चेअरमन

## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

## सी. पी. अँड बेरार (मध्यप्रदेश) प्रोव्हिन्शल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, नागपूर.

स्थापनाः—१९१२.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | २०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | रु. | १०,१४,००० |
| रिझर्व व इतर फंड | रु. | ११,२६,००० |
| खेळतें भांडवल | रु. | २,४९,६४,००० |

अध्यक्षः— सर माधवराव देशपांडे, के. बी. ई.

बँकिंगचे सर्व व्यवहार होतात.

बँकेचे शेअर्सची विक्री चालू आहे. गेल्या ४ वर्षांची मुनाफा वांटणी पांच दरानें केली.

सरकारची पूर्ण हमी असलेले शेंकडा तीन व्याजाच्या दराचे रोख्यांची विक्री चालू आहे. रोख्यांची मुदत १० व १५ वर्षांनीं भरेल.

विमा कंपन्या, बँका, म्युनिसिपालिट्या, शाळा, जमीनदार वगैरेंनीं वरील रोखे जरूर खरेदी करावेत.

गो. आ. भोंसुले,
मॅनेजर.

## दि व्हल्कन इन्शुअरन्स कं लि.

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठीं चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.

## सारस्वत को-ऑपरेटीव्ह बँक लि.

स्थापना १९१८

सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई ४

सब ऑफिस : १ दादर, २ माहीम

शाखा : मार्केट, बेळगांव

अध्यक्ष : वा. पुं. वर्दे, बी. कॉम्.

सेक्रेटरी : श. वि. सझगिरी, बी. कॉम्.

एकूण खेळतें भांडवल रु. १ कोटीवर



—सर्व प्रांतांतील—
सुती—गरम—रेशमी
—खादीचें माहेरघर—

## खादी मन्दिर

२६२, बुधवार पेठ
ढमढेरे बोळाजवळ,
पुणें २.




REGISTERED No. B. 3434

# अर्थ

*" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूली धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र*

वर्ष १६ | पुणें. बुधवार तारीख २२ फेब्रुवारी, १९५० | अंक ८

स्थापना १९३६

**युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा**

*पॅलेस स्ट्रीट, सातारा.*

शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नाशिक व बार्शी.

ता. ३१–१२–४८ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ५,००,००० |
| रिझर्व व इतर फंड्स | रु. | १,३१,००० |
| ठवी | रु. | ७९,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ८९,००,००० |

मुदत ठवीवरील व्याजाचे दर :

१ वर्ष — रु. १–८–० ; दोन वर्षे — रु. २–१२–० ; तीन अगर अधिक वर्षे — ३ रुपये

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १–८–० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | " | २–०–० |
| चालू डिपॉझिट | " | ०–८–० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.
वा. ग. चिरमुले, बी. ए., एलएल. बी., चेअरमन

**सी. पी. अँड बेरार (मध्यप्रदेश) प्रोव्हिन्शल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, नागपूर.**

स्थापनाः—१९१२.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | २०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | रु. | १०,२४,००० |
| रिझर्व व इतर फंड | रु. | ११,२६,००० |
| खेळतें भांडवल | रु. | २,४९,६४,००० |

अध्यक्षः— सर माधवराव देशपांडे, के. बी. ई.

**बँकिंगचे सर्व व्यवहार होतात.**

बँकेचे शेअर्सची विक्री चालू आहे. गेल्या ४ वर्षांची मुनाफा वांटणी पांच दरानें केली.

**सरकारची पूर्ण हमी असलेले** शेंकडा तीन व्याजाच्या दराचे रोख्यांची विक्री चालू आहे. रोख्यांची मुदत १० व १५ वर्षांनीं भरेल.

विमा कंपन्या, बँका, म्युनिसिपालिट्या, शाळा, जमीनदार वगैरेंनीं वरील रोखे जरूर खरेदी करावेत.

गो. आ. भोंसुले,
मॅनेजर.

**'अर्थ' ग्रन्थमाला.**

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

**दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.**

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.

**सारस्वत को-ऑपरेटीव्ह बँक लि.**

स्थापना १९१८

सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई ४

सब. ऑफिस : १ दादर, २ माहीम

शाखा : मार्केट, बेळगांव

अध्यक्ष : रा. पु. वर्दे, बी. कॉम.

सेक्रेटरी : ग. वि. मड्डगिरी, बी. कॉम्.

एकूण खेळतें भांडवल रु. १ कोटीवर



—सर्व प्रांतांतील— सुती–गरम–रेशमी —खादीचें माहेरघर—

**खादी मन्दिर**

२६२, बुधवार पेठ ढमढेरे बोळाजवळ, पुणें २.

# पांच हॉर्स पावरचें डिझेल एंजीन

घ्यावयाचें म्हणजे तें किर्लोस्कर पीटरच ! संपूर्ण पंपिंग सेटही मिळेल. चौकशी करा.

केळकर बंधु, बुधवार चौक, पुणें शहर.


## विविध माहिती

**हिंदुस्थानांतील सायकलींचा खप**—गेल्या वर्षी इंग्लंडनें सर्वात अधिक म्हणजे सुमारें २०,००,००० सायकली परदेशीं निर्यात केल्या. त्यापैकीं सर्वांत अधिक सायकली हिंदुस्थाननें खरेदी केल्या. ही संख्या ३,५०,००० एवढी मोठी आहे. आस्ट्रेलिआनें इंग्लंडकडून सर्वांत अधिक मोटार सायकली खरेदी केल्या. १९३७ सालीं ब्रिटननें ८,३१,००० सायकली परदेशांत विकल्या होत्या. गेल्या वर्षी ६५,००० मोटार सायकली परदेशांत विकण्यांत आल्या.

**बाटा हिंदुस्थानांत येणार**— जगप्रसिद्ध बुटाचे कारखानदार बाटा हे अतिपूर्वेकडील देशांत दौऱ्यावर गेले होते. परत येतांना ते हिंदुस्थानांत सुमारें तीन आठवडे रहाणार आहेत. बुटाच्या धंद्याविषयी सरकारी अंमलदार आणि कारखानदार ह्यांच्याशीं ते विचारविनिमय करणार आहेत. बूट तयार करण्याच्या नवीन पद्धति हिंदुस्थानांत उपयोगांत आणणें कितपत शक्य होईल ह्यासंबंधीं ते तपासणी करणार आहेत. ह्या नवीन पद्धतीमुळें बूट अधिक टिकतील आणि त्यांना पुन्हा टांके घालावे लागणार नाहींत. हिंदुस्थानांतील होतकरू तरुणांना इंग्लंड, फ्रान्स व हॉलंडमधील आपल्या कारखान्यांतून बुटाच्या धंद्याचें शिक्षण देणारी एक योजनाही ते जाहीर करतील असें समजतें.

**कलकत्ता इलेक्ट्रिक सप्लाय कॉर्पोरेशनचें कर्ज**—ह्या कॉर्पोरेशननें काढलेल्या कर्जरोख्यांपैकीं ८५ टक्के कर्ज रोखे अद्याप दलालांजवळच पडून आहेत. वास्तविक जानेवारींत जाहीर झालेल्या इंग्लंडमधील इलेक्ट्रिक कंपनीच्या रोख्यांपेक्षा कॉर्पोरेशनच्या रोख्यांवर व्याज एक टक्का अधिक आहे आणि रोख्यांची किंमतही एक टक्का कमी आहे. कलकत्त्यांत नेहमींच होणाऱ्या दंगलीमुळें २० वर्षे मुदतीच्या ह्या रोख्यांना मागणी आलेली नसावी असा अंदाज 'मँचेस्टर गार्डिअन' पत्राच्या आर्थिक समालोचनांत करण्यांत आला आहे.

**सायकलींच्या आयातीवरील निर्बंध**—मुंबई, कलकत्ता, मद्रास आणि दिल्ली येथील सायकली आयात करणाऱ्या व्यापाऱ्यांनीं हिंदुस्थान सरकारला एक खलिता पाठविला आहे. देशांतील सायकलींचा सांठा संपल्यानें त्यांची किंमत ५० टक्क्यांनीं वाढली आहे, म्हणन सरकारनें सायकली आयात करण्याची सरसहा परवानगी द्यावी असें त्यांचें म्हणणें आहे. हिंदुस्थानांत दरवर्षी सुमारें ७२,००० सायकली तयार होतात; परंतु खप मात्र ६ लाख होतो अशी माहिती त्यांनीं दिली आहे.

**बॉंबे इन्व्हेस्टर्स गाइड**—ह्या पुस्तकाची नवी आवृत्ति मेसर्स आर. आर. नावर आणि कं. ह्यांनीं प्रसिद्ध केली आहे. पुस्तकांत, पैसे गुंतविणाऱ्या लोकांना उपयुक्त अशी माहिती तपशीलवार पण थोडक्यांत दिलेली आहे. किंमत १ रु. ८ आणे आहे.

**पं. नेहरूंच्या अमेरिकेच्या पर्यटनाचा वार्तापट**—पं. नेहरू ह्यांच्या अमेरिकेंतील पर्यटनाचा एक बोलपट सुप्रसिद्ध मेट्रो–गोल्डविन–मेयर कंपनीनें तयार केला आहे. ह्या बोलपटाचे ४ भाग असून ते दाखविण्यास ३५ मिनिटें लागतात. हा वार्तापट पंतप्रधान पं. नेहरू ह्यांना कंपनीतर्फे भेट म्हणून नुकताच देण्यांत आला.

**रशिआजवळील सोनें**—लंडनमध्यें रशिआजवळ किती सोनें असावें ह्याबद्दल अंदाज करण्यांत येत आहेत. रशिआजवळ बरेंच सोनें असून त्याचा सांठा वाढत जात असावा असा तर्क आहे. कम्युनिस्ट देशांशीं व्यापार–व्यवहार करतांनाच फक्त रशिआ सोन्याचा उपयोग करतो. इतर देशांशीं व्यापार करतांना वस्तूंच्या ऐनजिनसी बदलाची पद्धत अंमलांत आणण्यांत येते.

**ताजमहालाची दुरुस्ती**—जगांतील ७ आश्चर्यांत गणना झालेल्या ताजमहालाची दुरुस्ती १९४० सालांत सुरू झाली. ती पूर्ण होण्यास अद्याप दोन वर्षे लागतील. दुरुस्तीसाठीं ३,५०,००० रुपये खर्च येणार असून तो हिंदुस्थान सरकार करणार आहे. ह्याच्यापूर्वी ताजमहालाची दुरुस्ती १८१० सालीं आणि १८७४ सालीं करण्यांत आली होती.

**टेलिफोनचा कारखाना**— इंडिअन टेलिफोन इंडस्ट्रीज लि. ह्या कंपनींत २५ लाख रुपये भांडवल गुंतविण्याचें म्हैसूर सरकारनें ठरविलें आहे. त्याशिवाय म्हैसूर संस्थानांतील इतर धंद्यांतूनही १७,३५,३२० रुपयांचें भांडवल घालण्याचें सरकारनें ठरविलें आहे. ह्या इतर धंद्यांत विजेवर चालणारी एक लोखंडाची भट्टी आणि लोखंडाच्या मातीचा चुरा करणारा एक कारखाना ह्यांचा समावेश आहे.

**ब्रिटनच्या कोळशाच्या धंद्यांतील नफा**— ब्रिटनचा कोळशाचा धंदा तीन वर्षांपूर्वी राष्ट्राच्या मालकीचा करण्यांत आला आहे. ह्या धंद्याला १९४९ सालीं सुमारें १,००,००,००० पौंड नफा झाला. ह्या नफ्यामुळें धंद्याला १९४७ सालीं झालेल्या तोट्यापैकीं अर्धा तोटा भरून निघाला आहे. १९४७ सालीं कोळशाच्या धंद्यांत २,३५,००,००० पौंड तोटा झाला होता.

**ब्रिटनची सार्वत्रिक निवडणूक**—ब्रिटनमध्यें लवकरच होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकींत पार्लमेंटमधील जागांची संख्या कमी झालेली असून उमेदवार मात्र वाढलेले आहेत. स्त्री-उमेदवारांची संख्याही वाढलेली आहे. पार्लमेंटमधील ६२५ जागांसाठीं १८६४ उमेदवार उभे आहेत. गेल्यावेळीं निवडलेल्या कॉमन्स सभागृहांत ६४० जागा होत्या व त्यासाठी १६७७ उमेदवार उभे होते. मजूर पक्षानें ६१९ उमेदवार उभे केले आहेत. हुजूरपक्ष आणि त्याचे दोस्त ह्यांनीं ६१७ उमेदवार उभे केले आहेत. १२३ स्त्री–उमेदवार उभे आहेत. सध्याचे बहुतेक सर्व मंत्री उभे आहेत. सभागृहाचे स्पीकर मि. क्लिफ्टन ब्राउन संकेताप्रमाणें बिनविरोध निवडून यावयाचे, पण ह्या खेपेला तसें झालेलें नाहीं.

**हिंदुस्थानांतील बेकारी वाढली**—उद्योग–विनिमय केंद्रांतील माहितीप्रमाणें हिंदुस्थानांत बेकारीची वाढ होत आहे असें दिसून येत आहे. १९४९ सालीं ह्या केंद्रांतर्फे १०,६६,३५१ लोकांनीं नोकरी मिळवण्याचे प्रयत्न केले. १९४८ सालीं ही संख्या ८,७०,९०४ होती. नोकरी दिली गेलेल्यांची संख्या अनुक्रमें २,५६,८०९ आणि २,६०,०८८ अशी आहे. नोकरी दिलेल्यांच्या संख्येंत जी घट दिसते, तिचें मुख्य कारण कारखान्यांत लागणाऱ्या कच्च्या मालाच्या तुटवड्यामुळें ते बंद पडूं लागले हें आहे.

# अर्थ

बुधवार, ता. २२ फेब्रुवारी, १९५०





संस्थापक : प्रो. वामन गोविंद काळे

संपादक : श्रीपाद वामन काळे


## चेकवरील एन्डॉर्समेंटची सही

### कायद्यांत व पद्धतींत सुधारणेची आवश्यकता

दररोज हजारों चेक्स बँकेंत भरले जातात आणि त्यांपैकी बहुतेकांवर पाठीवर सही करावी लागते. प्रत्येक चेक तपासून त्याच्या पाठीवरील सही बरोबर आहे किंवा नाहीं हें नीट पहावें लागतें. वसुलीसाठी भरलेल्या बँकेप्रमाणें ज्या बँकेवर तो काढलेला असतो, तेथेंहि एन्डॉर्समेंट अशीच तपासण्यांत येते. ह्या एन्डॉर्समेंटसाठी खातेदार व बँका ह्यांचा किती वेळ खर्च होतो, ह्याचा हिशेब केला तर तो आश्चर्यकारक वाटेल. कोणत्याहि कारणामुळें एन्डॉर्समेंट चुकली तर चेक परत केला जातो. त्यामुळेंहि त्रास व खर्च खातेदाराप्रमाणें कलेक्टिंग बँकरलाहि पुष्कळच होतो.

चेक हा बिल ऑफ एक्सचेंजचा ( हुंडी ) एक प्रकार आहे. अशा बिलांवर एन्डॉर्समेंट करून तीं बिलें हातोहात फिरत राहूं शकावीं, अशी मूळ कल्पना होती. बँकिंगचा प्रसार आतां पुष्कळच वाढला आहे आणि बँकांतील खात्यांची संख्या मोठी झाली आहे, त्यामुळें असे चेक फिरत रहाण्याची आवश्यकता उरलेली नाहीं. जेव्हां हुंडी हेंच आर्थिक व्यवहारांचें प्रमुख साधन होतें, तेव्हांची गोष्ट वेगळी. आतां हुंड्यांचें प्रमाण फारच उतरलें आहे आणि चेक्स हातोहात फिरत रहाण्याचेंहि कारण शिल्लक राहिलेलें नाहीं. ज्याचे नांवानें चेक काढलेला असेल, तो बहुधा हा चेक आपल्या खात्यांतच भरतो. अशा मनुष्याचें बँकेंत खातें नसेल, तरच तो हा चेक एखाद्या मित्रास किंवा दुकानदारास सही करून देतो व त्याचेकडून पैसे घेतो. बँकिंगचा प्रसार वाढेल, त्या प्रमाणांत चेक खात्यांत भरण्याची प्रवृत्तिच अधिकाधिक आढळेल. चेकच्या पाठीवर, ज्याचे नांवानें तो मूळ काढलेला असेल, त्याचे खालोखाल किती सह्या आढळतात, हें बँकर्सनीं मुद्दाम तपासून पाहिलें, तर वरील विधानांची सत्यता सहज पटेल.

बँकर चेकच्या पाठीवरील त्याच्या मालकाची सही काळजीपूर्वक तपासून घेतो, ह्याचें कारण सध्याच्या त्या संबंधांतील कायद्यानें बँकरवर टाकलेली जबाबदारी हें होय. ज्या चेकवरील एन्डॉर्समेंट चुकलेली आहे, अशा चेकचे पैसे बँकेनें दिले तर बँक त्यास जबाबदार रहाते. ज्याला बँकेस फसवून पैसे घ्यावयाचे आहेत, तो एन्डॉर्समेंटमध्यें चेक ठेवणारच नाहीं, हें उघड आहे. एन्डॉर्समेंट चुकीची असेल, तो व्यवहार बहुधा फसवाफसवीचा असणारच नाहीं; फसव्या मनुष्य नेहेमीच ज्यास्त दक्षता बाळगतो. ह्या कारणामुळें, एन्डॉर्समेंटची आतां उपयुक्तता फारशी उरलेली नाहीं असें मत इंग्लंडमध्यें वाढत चाललें असून, चेकवरील एन्डॉर्समेंटची आवश्यकता काढून टाकण्यासंबंधीं तेथें तज्ज्ञांत चर्चा चालू आहे.

ज्या चेकचे पैसे त्याच्या मालकासच, म्हणजे ज्याचे नांवानें चेक काढलेला असेल त्यासच फक्त मिळूं शकतील आणि ज्यावर एन्डॉर्समेंटची जरूरी उरणार नाहीं, असे नवीन प्रकारचे चेक सुरू करावेत, असें कांहींचें म्हणणें आहे. सध्याचे चेकहि चालू रहातीलच; ज्यांना ज्या प्रकारचा चेक वापरावयाचा असेल त्या प्रकारचा वापरावा. हळुहळु हा नवा चेकच अधिक लोकप्रिय होईल, अशी त्याच्या पुरस्कर्त्यांची अपेक्षा आहे. कांहीं वर्षे तरी दोन्ही प्रकारचे चेक चालू रहातील आणि त्यामुळें गोंधळ माजेल; सर्वच चेक्सवरील एन्डॉर्समेंट तपासाव्या लागून जुन्या प्रकारच्या चेक्समागील चुकीच्या सह्या एखादेवेळीं घाईनें पास होऊन जातील, असा विरोधकांचा आक्षेप आहे.

सुधारणा सुचविणारांपैकीं कांहींनीं एन्डॉर्समेंटच्या पद्धतीपेक्षा त्यासंबंधांतील कायद्याच्या दुरुस्तीचाच पुरस्कार केला आहे. कलेक्टिंग व पेइंग बँकरवर एन्डॉर्समेंट तपासण्याची जबाबदारी राहूं नये; इतकेंच नव्हे तर एन्डॉर्समेंटचीच आवश्यकता असूं नये, अशी ही सूचना आहे. त्यामुळें बँकांतील पुष्कळसें काम वाचेल आणि गिऱ्हाइकांचीहि सोय होऊन त्यांच्या वेळेची बचत होईल. त्यांना एन्डॉर्समेंट किंवा वेगळी पावती हवीच असेल, तर त्यांनीं आपली स्वतंत्र व्यवस्था करावी. चेकची रकम योग्य माणसासच दिली गेली नाहीं, तर कलेक्टिंग बँकरनें पेइंग बँकरची अर्थातच नुकसान भरपाई करावी लागेल. कारण, अशा रीतीनें चेक वटवला गेला तर गिऱ्हाइकाचा हुकूम पेइंग बँकरनें पाळला नाहीं असें होईल. कलेक्टिंग बँकरहि ज्याचे नांवानें चेक काढला असेल, अशा खातेदारांचेच चेक वसुलीसाठी सामान्यतः स्वीकारील. ही सुधारणा घडवून आणण्यास कायद्यांत दुरुस्ती आवश्यक होईल व त्यास थोडा काळ लागेल, परंतु कित्येक वर्षे दोन प्रकारचे चेक चालू ठेवण्यापेक्षा कायद्यांत बदल करणें बरें, असें मत व्यक्त केलें जात आहे.

कोणतीच सुधारणा न करतां, हल्लीच्या पद्धतीप्रमाणेंहि, ऑर्डर चेक न काढतां बेअरर काढल्यानें काम भागण्याजोगें आहे असें कांहींचें म्हणणें आहे. असें केलें म्हणजे एन्डॉर्समेंटची आवश्यकता उरतच नाहीं. त्याचप्रमाणें, चेक क्रॉस करून "अकाउंट पेई ओनली" असें त्यावर लिहिल्यानेंहि चोरी किंवा लबाडी ह्यांपासून संरक्षण होऊं शकतें. परंतु, ही पद्धति सर्वांनीं अंमलांत आणल्याविना बँकांचा कांहींच फायदा होणार नाहीं, आणि विशिष्ट पद्धतीनेंच चेक लिहिण्याबद्दल लहान फर्म व व्यक्ति आग्रह धरूं शकणार नाहीं, असें त्यास उत्तर देतां येईल.

चेक्सच्या एन्डॉर्समेंटबाबत कायद्यांत किंवा पद्धतींत सुधारणा कशी अगत्याची आहे, हें खालील उदाहरण स्पष्ट करील. एकाद्यानें (अ) आपलें देणें देण्यासाठी १०० रुपयांचा राम गोपाळ ह्यास चेक दिला आणि तो चेक ऑर्डर—क्रॉस होता असें समजूं. चुकीनें (अ) नें राम गोपाळ ऐवजी लक्ष्मण गोपाळ असें नांव चेकवर लिहिलें. राम गोपाळनें आपली खरी सही केली, तर बँक त्याला पैसे देण्याचें नाकारील. त्याला बँकेंत चेक वटविण्याचा असेल, तर त्यानें दुसऱ्या खोट्या—लक्ष्मण गोपाळ—ह्या नांवानें सही करून तो वटवला पाहिजे. खोटेपणाची बोंचणी लागू नये म्हणून फार तर त्या खोट्या सहीखालीं पुनः आपली नेहमीची खरी सही करूं शकेल. परंतु चेक हरवला आणि तो (राव-

णा)च्या हातीं गेला, तर तो मात्र लक्ष्मण गोपाळ अशी " बरोबर " एन्डॉर्समेंट करून त्या चेकची वसुली दुसऱ्यामार्फत करून घेऊं शकेल. कारण, राम गोपाळपेक्षां तो ह्या बाबतींत स्वाभाविकच ज्यास्त दक्षता बाळगील. अशा प्रकारें एन्डॉर्समेंटचा दुरुपयोग होतो, परंतु सध्याच्या कायद्याप्रमाणें तो अपरिहार्य असतो. ग्रेटब्रिटनमधील बँकिंगच्या क्षेत्रांत चेक्समागील एन्डॉर्समेंटच्या सहीबाबत सध्या चर्चा चालू आहे; तिची कल्पना येण्यास व येथाल परिस्थितीची तुलना करण्यास वरील माहिती "दि टाइम्स रिव्ह्यू ऑफ इंडस्ट्री" मधून घेऊन येथें सोपी करून दिली आहे, ती उपयुक्त ठरेल.

### सुचविण्यांत आलेल्या चेकचा नमुना

No. 12345

..................19......

To
**REPUBLIC BANK OF INDIA Ltd.,**
**POONA**

**PAY** the Banker presenting this Order for account **ONLY**

of........................................ Rs..............

the sum of........................................................

This Order is NOT TRANSFERABLE
Endorsement is NOT required.

---

### एक्सचेंज बँकेस रिझर्व्ह बँकेची मदत

फेब्रुवारी व एप्रिल, १९४९ मध्यें रिझर्व्ह बँकेनें रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया कायद्याच्या १८ व्या कलमाखालीं एक्सचेंज बँक ऑफ आफ्रिका अँड इंडिया लि. ला ८७ लक्ष, ४३ हजार रुपयांचें कर्ज दिलें. ह्या कर्जास तारण मुख्यतः मिळकतीच्या गहाणाचे दस्तऐवज हें आहे; कांहीं कर्ज सरकारी रोख्यांच्या तारणावर आहे. बँक मे, १९४९ मध्यें लिक्विडेशनमध्यें गेली. त्यापूर्वी रिझर्व्ह बँकेनें तिची तपासणी केली होती. बँकेची स्थिति असमाधानकारक असून शेड्यूल्ड बँकांच्या यादींतून ती वगळावी, अशी रिपोर्टांत सूचना होती. एक्सचेंज बँकेनें कांहीं अटी पुऱ्या केल्या तर तिच्याबद्दल पुनः विचार केला जाईल, असें तिला कळविण्यांत आलें होतें. परंतु तोंवर बँक लिक्विडेशनमध्यें गेली.

---

### दि प्रेसिडेन्सी इं. बँक लि.

वरील बँकेस १९४९ सालीं ६८,३१७ रु. निव्वळ नफा झाला. १५,००० रु. रिझर्व्ह फंडांत टाकून आणि २०,००० रु. ची करासाठी तरतूद करून ३½% करमाफ डिव्हिडंडसाठी २५,०१५ रु. लागतील. इतर फंडांत ७,५०० रु. टाकण्यांत येतील. म्हणजे, रिझर्व्ह व इतर फंड आतां १,३१,००० रुपयांवर होतील. बँकेचें वसूल भांडवल ७,१६,७४० रु. आहे. बँकेचें खेळतें भांडवल ७०,६८,३२५ रु. झालें आहे. ( चेअरमन: श्री. ग. रा. साठे. मॅ. डायरेक्टर: श्री. चिं. त्रिं. चितळे. मॅनेजर: श्री. गो. घों. जोगळेकर, बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी. )

---

**दिल्लींतील औद्योगिक प्रदर्शन**—दिल्ली येथें ता. २२ फेब्रुआरीला भरणाऱ्या ऑल-इंडिआ मॅन्युफॅक्चरर्स एक्झिबिशनच्या तयारीला जोरान सुरवात झाली आहे. प्रदर्शनांत उद्योगधंद्यांच्या सर्व शाखांचा माल ठेवण्यांत येईल. प्रदर्शनांत ६०० गाळे अगर दुकानें असून त्यापैकीं ५०० जागा प्रदर्शकांना देण्यांत आल्या आहेत. ह्या प्रदर्शनासाठी लागणाऱ्या बांधकामासाठी सरकारनें ५०० टन पोलाद पुरविलें आहे.

### भारतांतील व पाकिस्तानांतील कापडाच्या गिरण्या

( ३१ ऑगस्ट, १९४९ अखेरचे आकडे )

| | भारत | पाकिस्तान |
|---|---|---|
| एकूण गिरण्या | ४१६ | १४ |
| चात्या | १,०५,३३,७९९ | १,६९,६५२ |
| माग | १,९७,८०७ | ४,६०१ |
| वसूल भांडवल ( कोटी रु. ) | ८६.२८ | १.९४ |

---

### ब्रिटिश कापडाची निर्गत

ब्रिटिश गिरण्यांनीं १९४९ मध्यें १९४८ च्या मानानें बरीच ज्यास्त निर्गत केली असली, तरी १९४० चे निर्गतीपेक्षा ती अद्याप कमीच आहे.

| | कापड ( कोटी चौ. वार ) | किंमत ( लक्ष पौंड ) | प्रत्येक चौ. वाराची सरासरी किं. ( पेन्स ) |
|---|---|---|---|
| १९३८ | १३८ | ३१९ | ५.५३ |
| १९४० | ९७ | ३२१ | ७.९० |
| १९४२ | ४८ | २४३ | १२.०७ |
| १९४५ | ४४ | २८७ | १५.६६ |
| १९४८ | ७६ | ८५७ | २७.०३ |
| १९४९ | ९० | १०५६ | २८.०७ |

ब्रिटिश प. आफ्रिका, ऑस्ट्रेलिया, द. आफ्रिका, पाकिस्तान, भारत, न्यूझीलंड व मलाया ह्या ब्रिटिश कापडाच्या प्रमुख बाजारपेठा आहेत.

---

### ब्रिटिश सुताची निर्गत

पाकिस्तान, भारत, नेदरलंडस, ऑस्ट्रेलिया, हाँगकाँग, नॉर्वे व डेन्मार्क ह्या ब्रिटिश सुताच्या प्रमुख बाजारपेठा आहेत. एकूण निर्गतीचे तुलनात्मक आकडे खालीं दिले आहेत.

| | सूत ( लक्ष पौंड ) | किंमत ( लक्ष पौंड ) | प्रत्येक पौंडाची सरासरी किंमत ( पेन्स ) |
|---|---|---|---|
| १९३८ | ११२९ | ९६ | १८.२८ |
| १९४० | ६६७ | ७४ | २६.७९ |
| १९४२ | १८७ | ३४ | ४३.४४ |
| १९४५ | १६१ | २९ | ४३.४७ |
| १९४८ | ५९० | १६७ | ६८.१० |
| १९४९ | ८२० | २३५ | ६८.८९ |

---

**फौंड्री तज्ज्ञ शिकून परतले**—हरिहर येथील म्हैसूर किर्लोस्कर लि. ह्या कंपनीचे फौंड्री सुपरिंटेंडेंट आपल्या धंद्याचा अधिक अभ्यास करण्यासाठी कंपनीतर्फे युरोपांत गेले होते, ते नुकतेच परत आले. युरोपमध्यें सहा महिने हिंडून त्यांनीं बऱ्याच लोखंड व पोलादाच्या कारखान्यांचें निरीक्षण केलें. ह्या अद्यावत ज्ञानाचा उपयोग मालाची निर्मिति आणि दर्जा वाढविण्यास होईल असा त्यांना विश्वास वाटत आहे.

**हिंदी चलन आणि जागतिक बँक**—जागतिक बँकेंत हिंदनें आपल्या वाटणीची रक्कम भरली. त्यानंतर हिंदी चलनाची किंमत कमी करण्यांत आलेली आहे. हिंदी चलनाची त्यावेळची किंमत टिकवून धरण्यासाठी हिंदुस्थान सरकारला १०.४६ कोटी रुपये आणखी भरावे लागले.

## कंपन्यांचा कायदा व आगामी सुधारणा

लेखक:—श्री. म. कृ. चितळे, बी. कॉम., कंपनी कायद्याचे सल्लागार व टेक्स्टाइल ॲडव्हायजर, मुंबई

गेल्या जुलै महिन्यांत येथील क्रॉनिकल पत्रामध्यें, स्टॉक एक्सचेंज कमिटीच्या कंपनी कायद्यांत सुधारणा करण्याबाबत सरकारला धाडलेल्या साठ पानी निवेदनांतील मुख्य भाग छापला होता. त्यानंतर नोव्हेंबरमध्यें सरकारनें, एका तज्ज्ञांच्या कमिटीनें सुचविलेल्या सुधारणांची एक यादी प्रसिद्ध करून त्यावर १५ फेब्रुआरीपर्यंत लोकांची मतें मागविली. वर्तमानपत्रांत तिचा सारांश आला. थोडाफार पत्रव्यवहार व स्फुटें आलीं. कांहीं वर्तमानपत्रांनीं लेखही लिहिले. आपल्या "अर्थ"मध्यें नोव्हेंबर ९,१६,२३ व ३० तारखांच्या अंकांत आपण वाचकांच्या माहितीसाठी सरकारी यादीचा तर्जुमा छापलात. पण या विषयावर जे कंपन्या चालवितात ते डायरेक्टर व मॅनेजिंग एजन्टस्, व जे कंपन्यांना भांडवल पुरवितात ते शेअर होल्डर्स व जे कायद्यानें शेअर होल्डर्सचे, प्रतिनिधी, पण वास्तविक मॅनेजिंग एजन्टस्च्या कृपादृष्टीवर ऑडिट व इन्कमटॅक्सचें काम मिळवितात ते हिशेब तपासनीस यांपैकी कोणी आपलीं मतें वा अनभव-अडचणी प्रसिद्ध केल्याचें फारसें दिसत नाहीं. तेव्हां या तीन गटांना विनंती कीं त्यांनीं आपल्या सूचना, अनुभव व अडचणी, जनतेच्या व वाचकांच्या माहितीसाठी "अर्थ" मधून प्रसिद्ध कराव्यात.

कंपनी कायद्यांत सुधारणा करणें जरूर आहे याबद्दल दुमत नाहीं. मात्र काय सुधारणा कराव्यात याबाबत दुमत व वाद होणें अपरिहार्य आहे. यावेळीं कीं जेव्हां स्वातंत्र्यसूर्य उगवत आहे व औद्योगिक उन्नतीची प्रभात दिसत आहे, अशा वेळीं जनतेचे, पैपैसा साठवून जमविलेलें भांडवल, दुसऱ्याच्या हातांत पूर्ण सुरक्षित राहील अशी खबरदारी घेणें सध्याचे सरकारचें एक कर्तव्य आहे व तें सुरक्षित व शाबित ठेवणेंची जबाबदारी, अशा रीतीनें शेअर्स काढून भांडवल गोळा करून कंपन्या काढणारांची आहे. विश्वास व सुरक्षितपणा यावर जनतेकडून भांडवल मिळेल. तो विश्वास नसेल व आपल्या पैशाच्या सुरक्षितपणाची खात्री नसेल तर भांडवल, या पद्धतीनें, पुढें येणार नाहीं. नव्या कंपन्या काढणारांना आज नवें भांडवल जमविणें कठीण जात आहे. तेव्हां या वेळीं, गुप्तता सोडून, शेअरहोल्डर्सनी, कंपन्या काढणारांनीं व चालविणारांनीं पुढें येऊन, उहापोह करणें सर्वांच्या हिताचें होणार आहे. त्याचप्रमाणें या सुप्रभातीं, ऑडिटर्स उर्फ हिशेब तपासनीस (एका दृष्टीनें शेअरहोल्डर्सचे ट्रस्टी), यांनीं आपल अनुभव व अडचणी (पाहिजेतर टोपण नांवानीं) जाहीर करणें अगत्याचें आहे, नव्हे ते त्यांचें, भारताच्या व विशेषत: महाराष्ट्राचे औद्योगिक उन्नतीसाठी एक कर्तव्य आहे.

कंपन्यांचा प्रसार होण्यापूर्वीचे कालांत, आपला पैसा सुरक्षित ठेवण्यासाठी सावकारांना कांहीं यावें लागत असें. इंग्रजी आली व हळूहळू ठेव ठेवणारास थोडेसें व्याज मिळूं लागलें. त्यावेळीं इंग्रज, फ्रेंच, डच् हे जलपर्यटनें करून व्यापार व राज्यें करूं लागले. "कंपनी" हें रोपटें तिकडचें तिकडे रुजून मग इकडे आलें. चार लोकांचें भांडवल गोळा करावयाचें व त्यावर धाडसानें व्यापार करून भरपूर मोबदला घ्यावयाचा अशी सुरवात झाली व चांगल्याबरोबर कांहीं बदमाषही ह्या मार्गानें पुढें येऊं लागले. म्हणून तिकडील सरकारना "कंपनी कायदा" करून शेअरहोल्डर्सचे पैसे सुरक्षित रहाण्याची तजवीज करावी लागली व "कंपनी कायद्यांत" वेळोवेळीं सुधारणा कराव्या लागल्या. हें झाड खरें परदेशी आहे. आपण त्याचें कलम केलें व ह्या झाडास मधुर फळें यावयाची हांव धरली. कांहीं काळ कांहीं ठिकाणीं मधुर फळेंही आलीं. परंतु, मालकाचें लक्ष नसल्यास अगर तो अज्ञानी असल्यास ज्याप्रमाणें बागेची निगा न राहतां झाडावर बांडगुळें वाढतात व मग झाडांचा नाश होतो त्याप्रमाणें, कंपन्यांचे खरे मालक, जे शेअरहोल्डर्स त्यांना कंपनी कायद्याचें व कंपनी कारभाराचें ज्ञान नसल्यामुळें व आपल्या हक्काबाबत जाणीव नसल्याकारणानें व त्याचप्रमाणें कंपनी कायद्यांत कांहीं दोष राहून गेल्यामुळें हीं झाडें वा कंपन्या उत्तम व भरपूर उत्पन्न देईनाशा झाल्या. कांहीं ठिकाणीं राखणदारच कांहीं वेळां फळें खाऊं लागला. तेव्हां आतां या प्रभातकाळीं हें सर्व तपासून कायद्यांत योग्य त्या सुधारणा करवून हीं शेतें व बागा साफसूफ करून योग्य तऱ्हेनें योग्य मोबदला देऊं शकतील अशी व्यवस्था करणें फार अगत्याचें झालें आहे.

पूर्वीचे काळीं व सध्याही व्यापारी पेढ्या क्रोडो रुपयांचा व्यवहार करीत असत व करतात. व्यापारांत भांडवल सारखें फिरत असतें व सीझनपुरतीच पैशाची अडचण असते. पण ज्या वेळीं कारखानदारी व तीही मोठ्या प्रमाणांत करण्याची पाळी येत त्यावेळीं, जमीन, इमारती व माशिनरी व (स्टॉक) मालाचा सांठा यासाठीं फार मोठाल्या रकमा लागतात व हें भांडवल गुंतून पडलेलें असतें, फिरतें नसतें, यासाठीं हें एकाद्या पेढीकडून होत नाहीं. त्यास जनता पुढें येऊन शेअर्स घेऊन हातभार लावते. स्वार्थानें कां होईना, पण जनताच, आपलें शिल्लक टाकलेले, साठविलेले पैसे पुढें करून असे कारखाने काढण्याची शक्यता उत्पन्न करते. हे पैसे सुरक्षित राहून योग्य कारणीं लावणेची जोखीम, कंपनी काढणारावरच असते व तशी जोखीम आपलेवर आहे असें समजून काम चालतें कीं नाहीं हें पाहणें सरकारचें व भांडवल पुरविणाऱ्या शेअरहोल्डर्सचें कर्तव्य आहे.

जगांत चांगल्याबरोबर वाईट असतें. कायद्याचा कीस काढून त्यांतील पळवाटांचा फायदा उठविता येतो. परंतु असा फायदा घेणाऱ्यांत, कर्तव्यनिष्ठा व जबाबदारीची जाणीव यांचा अभाव असतो. हें वाईटाचें प्रमाण वाढल्यास कांहीं कंपन्या इतरांपेक्षा जास्त तोटे दाखवितात व मग भांडवल गुंतविणाऱ्यांचा विश्वास उडतो व वाढीसाठी किंवा नव्या कारखान्यासाठी चांगल्या चांगल्या पेढ्यांनाही जनतेकडून भांडवल मिळत नाहीं. जनतेचे भांडवल पै पै करून जमविलेलें असतें, सट्ट्यामध्यें किंवा रेसेसमध्यें पैसे मिळतात त्याप्रमाणें गोळा केलेलें नसतें, व म्हणून फक्त "विश्वासावर"च तें बाहेर येऊं शकतें. सध्या असा विश्वास डळमळीत झालेला दिसतो. तेव्हां अशा प्रसंगीं, भांडवल गुंतविणाऱ्या जनतेचा विश्वास संपादन करणें हें सध्या कारखानदारांचें व कंपन्या काढणारांचें व चालविणारांचें कर्तव्य होत आहे. त्यासाठी कंपनी कायद्यांतील दोष काढून टाकून, तो कायदा त्यांत लहान लहान भागिदारांना (शेअरहोल्डर्सना) त्यांचे योग्य हक्क देऊं शकेल अशी सुधारणा करण्याची वेळ आली आहे, असें पुष्कळांचें मत झालें आहे. त्यासही एक उत्तर पक्ष आहे व म्हणूनच "कंपन्या" चालविणारांनीं पुढें येऊन आपल्या अडचणी जनतेपुढें ठेवणें अगत्याचें आहे. ते तसें करतील काय?

## दख्खनच्या दौलतेस नेहरूंचा हार्दिक पाठिंबा

### पंडित नेहरू व शंकरराव किर्लोस्कर ह्यांचा उद्बोधक संवाद

कोल्हापूर येथें भरणाऱ्या "दख्खनची दौलत" प्रदर्शनाचें उद्घाटन करण्यास पंडित जवाहरलाल नेहरू यांना समक्ष विनंति करण्यासाठी प्रदर्शनाचें अध्यक्ष श्री किर्लोस्कर व सेक्रेटरी श्री. रामभाई सामाणी दिल्लीस जाऊन आले. किर्लोस्कर–सामाणींचें सहास्य स्वागत करून पंडित नेहरू म्हणाले- "हे पहा किर्लोस्कर, तुम्ही चालविलेल्या कामाची मला माहिती आहे. परवां मी तुमचा पुण्याचा कारखाना पाहिलाच आहे. दक्षिणेंतील मालाचें औद्योगिक प्रदर्शन भरविण्याचें तुम्हीं योजिलें आहे. ही कल्पना मला फारच आवडली. मी प्रदर्शनांचा भोक्ता आहे. शिवाय तुमच्या प्रदर्शनांतील नावीन्य व अभिनवताहि माझ्या लक्षांत आली आहे. पण माझ्यापुढें मुख्य प्रश्न आहे तो सवड मिळविण्याचा. माझ्यापुढें आणीबाणीच्या कामांचे डोंगर पडले आहेत. रात्रीं २ पर्यंत काम करूनहि हें काम उरकत नाहीं. ही परिस्थिति लक्षांत घ्या." त्यावर शंकरराव किर्लोस्कर म्हणाले, "आपल्या प्रत्येक क्षणाची किंमत किती अमूल्य आहे व आपल्यावर केवढी प्रचंड जबाबदारी आहे हें आम्ही पुरेतेपणीं जाणून आहों. पण आपण परवां आमच्या पुण्याच्या कारखान्यांत येऊन गेलांत, त्यामुळें कारखान्याचे चालक व कामगार या सर्वांस केवढा आल्हाद वाटला व त्यांचा उत्साह किती वाढला! देशाच्या औद्योगीकरणासाठी असा सगळीकडे हुरूप उत्पन्न झाला पाहिजे. आमच्या प्रदर्शनाचा तो एक प्रमुख हेतु आहे.

### नामी कल्पना

"आतां आपणास प्रत्येक कारखान्यास जातीनें भेट देतां येण्यासारखें नसलें तरी महाराष्ट्रांतील सर्व कारखान्यांचें अवघ्या दोन तासांत विमानांतून दर्शन घेतां येईल. आम्हीं त्यासाठी विमानमार्गाचा नकाशाच केला आहे. महाराष्ट्रांतील कारखान्यांवरून फेरी घालत असतां आपण विमानांतील रेडिओवरुन जे चार शब्द सांगाल ते खालीं जमलेल्या मंडळींना ऐकतां येतील. आपले १५–१६ तास आम्हांला मिळतील तर तेवढ्या वेळांत दिल्लीहून निघून दख्खनचे कारखाने व प्रदर्शन दोन्ही पाहून आपण परत येऊं शकाल."

पंडितजी अत्यंत मनमोकळेपणानें हंसून म्हणाले. "कल्पना फार नामी आहे. पण एप्रिल व मे महिन्यांत माझा प्रत्येक तास अगोदरच गुंतून गेलेला आहे, त्यापुढें माझा नाइलाज आहे. पुढें सवड झाली तर तिकडे येण्यास आनंद वाटेल. इथें दिल्लींत माझ्या उंबऱ्यांत एक प्रदर्शन उभारण्यांत आलें असून व तें पहावयास जाण्याची मला उत्कंठा असूनहि तिकडे जाण्यास मला सवड मिळत नाहीं. यावरूनच काय तें पहा. या जवळच उभे असलेल्या फॉरिन अफेअर्सच्या सेक्रेटरींना विचारा म्हणजे माझी कशी तारांबळ चालू आहे, त्याची ते कल्पना देतील." यावर शंकरराव म्हणाले, "आपण आमच्या निमंत्रणाला मान देऊं शकत नसला तरी आमच्या उपक्रमाला आपला हार्दिक पाठिंबा आहे, हें आपल्या तोंडून ऐकायला मिळालें हा देखील आमचा थोडाथोडका लाभ नाहीं. त्याबद्दल व आपण आमच्या भेटीसाठी दिलेल्या आपल्या वेळेबद्दल आम्ही आपले आभारी आहात."

---

### नाथ बँक लि., कलकत्ता

वरील बँकेची मुख्य कचेरी व तिच्या शाखा ह्यांनीं १७ फेब्रुवारीपासून आपला व्यवहार बंद केला. कलकत्ता हायकोर्टानें तिला घेणेकऱ्यांना पैसे देण्यासाठी एका महिन्याची मुदत (मॉरेटोरियम) दिली आहे.

---

### मालक–कामगार संबंधी नवा कायदा

१९४७ चा इंडस्ट्रिअल डिस्प्यूट्स ॲक्ट व तत्सम इतर कायदे ह्यांची जागा घेणारा कायदा करणारें एक बिल मजूरमंत्री ना. जगजीवनराम ह्यांनीं पार्लमेंटांत मांडलें आहे. सरकारी नोकर, सैनिक व घरगुती नोकर हे वगळून बाकी सर्व प्रकारच्या नोकर–कामगारांना बिलांतील नियम लागू होतील.

---

### बँकिंग कायदा : सिलेक्ट कमिटी रिपोर्ट

इंडियन बँकिंग कंपनीज (अमेंडमेंट) बिलावरील सिलेक्ट कमिटीचा रिपोर्ट अर्थमंत्री डॉ. मथाई ह्यांनीं पार्लमेंटास गेल्या आठवड्यांत सादर केला. बँकांचें एकत्रीकरण सुलभ करणाऱ्या कांहीं दुरुस्त्या सिलेक्ट कमिटीनें सुचविल्या आहेत. महत्त्वाचे फेरबदल कमिटीनें केलेले नाहींत.

---

### दि भारत इं. बँक लि.

वरील बँकेचें वसूल भांडवल ३,९९,१०५ रु. आहे. ठेवींची रक्कम गतवर्षीपेक्षा वाढून ती ५१,२८,६७५ रु. झाली आहे. १९४९ मध्यें बँकेस ३५,३८० रु. नफा झाला. एकूण ५९,५८,८४३ रु. खेळत्या भांडवलापैकीं २२,५५,२११ रु. कर्जांत गुंतविलेले आहेत. लक्ष्मी रोडवर बँकेनें स्वतःची जागा खरेदी केली आहे तिचेवर तिच्या इमारतीचें बांधकाम लवकरच सुरू होणार आहे, असें समजतें. ऑर्डिनरी भागांवर ३% करमाफ डिव्हिडंड दिलें जाईल व क्यु. प्रे. भागांस नेहेमींप्रमाणें ६% मिळेल. (चेअरमन: श्री. बा. भ. वाळवेकर. मॅ. डायरेक्टर्स: श्री. रा. व. साळवेकर, बी. ए. एलएल. बी. व श्री. नी. ना. क्षीरसागर.)

---

**सोलापूरची जुनी गिरणी**—सोलापूरची जुनी गिरणी सरकारनें चालवावयास घेतली असून त्यासाठी एका बँकेकडून कर्ज मिळण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे. गिरणीच्या सूत विभागापैकीं एक विभाग थोड्याशा दुरुस्तीनें चालू करतां येण्यासारखा आहे. हा विभाग चालू झाल्यावर १३,००० कामगारांपैकीं ४,००० कामगारांना कामावर घेण्यांत येईल. गिरणी चालू झाल्यावर भागीदारांचा एक प्रतिनिधी डायरेक्टर बोर्डावर घेण्याचा विचार करण्यांत येणार आहे.

**बँक ऑफ चायना**—बँक ऑफ चायनाच्या सिंगापूर येथील शाखेनें पेकिंगमध्यें स्थापन झालेल्या नव्या चिनी सरकारशीं आपण राजनिष्ठ राहणार असल्याचें जाहीर केलें आहे. चीनच्या जुन्या राष्ट्रीय सरकारचे बँकेंतील भाग ह्या नव्या सरकारनें घेतले. परंतु बँकेच्या सामान्य भागीदारांचे सर्व हक्कसंबंध सुरक्षित ठेवण्यांत आले आहेत. ह्याला अपवाद म्हणजे फक्त युद्धविषयक गुन्हेगारांचा आहे. बँकेच्या परदेशीय शाखांना सर्व व्यवहार पूर्वीप्रमाणेंच चालविण्याचे हुकूम देण्यांत आले आहेत. सिंगापूर येथील शाखेचा सर्वच्या सर्व नोकरवर्ग पूर्वीप्रमाणेंच कामावर ठेवण्यांत आला आहे.

## इनकमटॅक्स चुकविणारांची कार्यपद्धति

(२)

(२) कोणत्याही कारखान्याच्या भांडवलापैकीं बराच मोठा हिस्सा जमीन, इमारती, यंत्रसामुग्री इत्यादि, उत्पादन-साधनांवर खर्च होत असतो. ह्या उत्पादन साधनांची कार्यक्षमता नेहमीं शिगेला पोंचलेली ठेवणें कंपनीच्या चालकांचें कर्तव्यच असतें. इतकेंच काय, पण नैसर्गिक कारणांनीं अगर जुनीं झाल्यामुळें तीं निकामीं होतील त्यावेळीं त्यांची नव्यानें उभारणी करण्याचीही व्यवस्था करावी लागते. ह्यासाठी इंडियन इनकम टॅक्स ॲक्ट-प्रमाणें घसारा वाढण्याची सवलत दिलेली आहे. हा घसारा सांचत जाणारा असतो. परंतु, हिंदी भांडवलदारांनीं आपल्या कारखान्याची परिस्थिति मजबूत करण्याऐवजी, आपल्या फायद्यासाठीं कारखान्यांनाच धक्का दिलेला आहे. कांहीं नामांकित कंपन्यांच्या नांवाची, यंत्रसामुग्रीच्या खरेदीच्या किंमतीचीं खोटीं बिलें हिंदी भांडवलदारांनीं तयार केलीं आहेत आणि ह्या भरमसाट किंमतीच्या बिलाप्रमाणें दीर्घकाल पर्यंत घसारा काढण्यांत येत असतो. हा खोटा घसारा हिशेबांत दाखविल्यामुळें सरकारला बराच काळपर्यंत कराची पूर्ण वसुली करतां येत नाहीं. कर टाळण्याची ही पद्धत सर्वांत गर्हणीय असून तीबद्दल शिक्षा होणें अत्यंत जरूर आहे.

(३) धंद्यांत झालेला नफा कमी करून दाखविण्याचा आणखीही एक सोपा मार्ग आहे. तो म्हणजे, सर्व उत्पादन न दाखविणें. हा मार्ग सगळ्यांत सोपा असल्यामुळें धंदेवाइकांनीं तो फार मोठ्या प्रमाणावर अनुसरला आहे. दाखविलेलें उत्पादन आणि प्रत्यक्ष झालेलें उत्पादन ह्यांच्यामधील तफावतीचा फायदा अर्थात् चालक उपटतात. ह्या पद्धतीमुळें पहिल्या आंकड्याखालील तिन्ही प्रकारांनीं धंद्याचें नुकसान होतें. शिवाय कमी दाखविलेलें उत्पादन नियंत्रित किंमतीला कधींच विकलें जात नाहीं. त्या उत्पादनाची किंमत काळ्या बाजाराप्रमाणें घेतली जाते आणि काळ्याबाजाराला उत्पादकापासूनच प्रारंभ होतो.

(४) काळ्या बाजारांत मिळविलेला पैसा निराळ्या नांवानें काढलेल्या आपल्याच कंपन्यांतून गुंतविणें डायरेक्टर्सना अगर मॅनेजिंग एजंटसना फारच सोईचें पडतें. पुष्कळदां ह्या नव्या कंपन्यांचे पत्तेसुद्धां खोटे असतात. ह्या पद्धतीनें काळ्या बाजारांत मिळविलेल्या पैशाला कायदेशीर अस्तित्व तर देतां येतेंच, परंतु प्राप्तीवरील करांतही बचत होते. कारण, कंपनीचा नफा एका माणसाच्या मालकीचा होण्याऐवजीं निरनिराळ्या व्यक्तींत वांटला जातो. सरकारला जो कर मिळतो तो अर्थात् कंपनीच्या नफ्यावर मिळतो. कंपनीचें सर्वच भांडवल एका माणसानें विकत घेतलें असतें तर जितका कर सरकारला मिळाला असता तितका मिळत नाहीं. सरकारच्या अनिश्चित आणि जबर कराच्या धोरणामुळें लोकांचा सरकारवरील विश्वास उडाला आहे म्हणून भांडवल उद्योगधंद्यासाठीं पुढें येत नाहीं अशी हाकाटी चोरानें करण्यांत येत असते. भांडवलदारांच्या हातीं असलेल्या वृत्तपत्रांमधून असा प्रचार सर्व देशभर करण्यांत येत आहे. ह्या प्रचारामुळें भांडवलवाल्यांना पाहिजे ती गोष्ट घडून आली आहे. युद्धोत्तर कालांतील तेजीच्या कालांत सुद्धा शेअर-बाजार नरम होता. कारण इनकम-टॅक्स इन्व्हेस्टिगेशन कमिटीचें कार्य चालू असल्यामुळें बहुतेक भांडवलदारांना काळ्या बाजारांत मिळविलेला पैसा खोट्या नांवावर गुंतविणें अडचणीचें होत होतें. बहुतेक सर्व भांडवल अशा तऱ्हेनें गुंतविले जात असल्यानें त्या भांडवलाला आळा बसतांच, शेअर-बाजार मंदावल्यास त्यांत नवल कांहींच नाहीं.

(५) नफा कमी दाखविण्याचा आणखी एक मार्ग असा आहे. एखाद्या कंपनीचा मूळ धंदा पैसे गुंतविण्याचा नसतांना सुद्धा शेअर्सच्या खरेदी-विक्रीचा धंदा केला जातो. एकाच मालकाच्या मालकीच्या अनेक कंपन्या असतील तर व्यवहार करणें फारच सोपें जातें. (अ) फायद्यांत चालणारी एखादी कंपनी आपल्या मालकीच्या दुसऱ्या कंपनीचे भाग किंमती चढल्या असतांना विकत घेते आणि भागांचे भाव कमी झाले म्हणजे विकून टाकते. मात्र ज्या दिवशीं हा व्यवहाराची नोंद केलेली असते त्यावेळींच ते केले जातात असें नाहीं. कंपनीच्या धंद्याच्या वर्षाच्या अखेर ह्या व्यवहारांची 'योग्य' नोंद करण्यांत येते. (ब) दुसऱ्या एखाद्या कंपनीचे भाग कंपनीच्या पैशांनीं विकत घेण्यांत येतात आणि त्या कंपनीचीं नफा जाहीर करण्याची वेळ झाली म्हणजे ते विकण्यांत येतात. नंतर हे भाग पहिल्या कंपनीनें त्याच किंमतीला परत विकत घेतले तरी भागांच्या किंमतीची रक्कम गुंतून पडते आणि त्यावरील व्याजाच्या उत्पन्नाला मूळची कंपनी मुकते. (समाप्त)

---

## डायरेक्टराच्या निवडणुकीबाबत वांधा : हायकोर्टांत समझोता

इंडियन मॅन्युफॅक्चरिंग कं. लि. च्या आर्टिकल्सप्रमाणें तिचे दोन डायरेक्टर (जे सर्वांत ज्यास्त काळ डायरेक्टर होते) निवृत्त व्हावयाचे होते. श्री. नारायणदास मनमोहनदास रामजी (वादी) ह्यांच्या म्हणण्याप्रमाणें, दुसरा व सहावा प्रतिवादी हे दोघेहि समान काळ डायरेक्टर होते, परंतु त्यापैकीं कोणी निवृत्त व्हावें हें ठरविण्याची आपसांत कांहींच व्यवस्था केली नव्हती. त्यामुळें, आर्टिकल्सप्रमाणें चिठ्ठ्या टाकूनच तें निश्चित करावयास हवें होतें. चिठ्ठ्या न टाकतां, दुसरे प्रतिवादी म्हणजे कंपनीच्या बोर्डाचे चेअरमन ह्यांनीं "वादी व सहावे प्रतिवादी हे निवृत्त होत असून फेरनिवडणुकीस पात्र आहेत" असा रिपोर्ट लिहून त्यावर सही केली. असा रिपोर्ट करण्यास बोर्डास अधिकार नव्हता, असें वादींचें म्हणणें होतें.

१६ सप्टेंबर १९४९ रोजीं कंपनीची ६८ वी वार्षिक सभा भरली, तेव्हां वादी श्री. नारायणदास ह्यांच्या निवडणुकीचा प्रस्ताव मतांस टाकण्यांत आला, तो नामंजूर झाला. तेव्हां दुसरे प्रतिवादी म्हणजे अध्यक्ष ह्यांनीं वादी निवडून न आल्याचें जाहीर केलें. ज्या अर्थीं दोन उमेदवार नव्हते, त्या अर्थीं आपली निवडणूक जाहीर व्हावयास हवी होती आणि अध्यक्षांनीं मांडलेला प्रस्ताव चुकीचा होता असा श्री. नारायणदास ह्यांचा दावा होता. मुंबई हायकोर्टाकडे त्यांनीं अर्ज करून, आपली निवडणूक जाहीर व्हावी अशी मागणी केली.

१६ सप्टेंबर रोजीं वादी श्री. नारायणदास ह्यांची डायरेक्टरशिपची मुदत संपली होती. त्यांच्या निवडणुकीचा ठराव सभेंत मांडण्यांत आला व तो नामंजूर झाला, त्यामुळें त्यांची निवडणूक झाली नाहीं, हें जाहीर करण्यांत कांहींच चुकलें नाहीं असा मुद्दा प्रतिवादी कंपनी व तिचे अध्यक्ष ह्यांनीं पुढें मांडला. परंतु, वादी व प्रतिवादी ह्यांचा समझोता होऊन, पुढील साधारण सभेपर्यंत वादी डायरेक्टर रहावा, त्यावेळीं त्यानें निवृत्त व्हावें, फेरनिवडणुकीस तो पात्र राहील, अशा अटीवर प्रकरण निकालांत निघालें.

### खोट्या कंपनीविषयीं इषारा

मुंबई, कलकत्ता आणि मद्रास येथील पोलिसांकडून मे. बर्मा एंटरप्राइझेस लि. नांवाच्या एका खोट्या कंपनीच्या 'दोन' प्रतिनिधींबद्दल व्यापाऱ्यांना धोक्याचा इषारा देण्यांत आला आहे. ह्याच नामधारी कंपनीच्या दोन प्रतिनिधींनीं १९४८ सालीं कांहीं व्यापाऱ्यांना फसविलें होतें.

ही फसवणूक थोड्याथोडक्या रकमेची नसून ३५,००० रुपये रकमेची आहे. वरील प्रतिनिधींनीं बरेचसें जुनें लोखंड देण्याचें कबूल केलें होतें. आणि आपल्या कंपनीनें चालविलेल्या 'बर्मा मार्केट रिव्ह्यू' नांवाच्या मासिकांत हिंदी मालाच्या जाहिराती देण्याचेंही आमिष दाखविलें होतें. परंतु, ह्यापैकीं एकही गोष्ट केली नाहीं. फर्नांडिस आणि त्याचा मदतनीस असे दोघेजण हा उद्योग करीत होते.

ह्याच खोट्या कंपनीच्या नांवानें आणखीही एक प्रकारची ठकबाजी करण्यांत येत होती. ब्रह्मदेशांतून हिंदुस्थानांत येणाऱ्या हिंदी लोकांकडून पैसे घेऊन त्यांना, घेतलेल्या रकमेच्या ⅓ रकमेचे हिंदी बँकांवरील खोटे ड्राफ्ट कंपनीतर्फे देण्यांत येत असत. सध्या कंपनीचे दोन नवे प्रतिनिधी मुंबईत आणि प. बंगाल्यांत आपला उद्योग करीत आहेत, असा इषारा पोलिसांनीं दिला आहे.

### राजवाडे मंडळाचा बँकेवरील प्रतिनिधी

राजवाडे मंडळ पीपल्स को. बँक ही संस्था १९३३ सालीं स्थापन झाली. राजवाडे संशोधन मंडळ, धुळें ह्या संस्थेस सतत कांहीं उत्पन्न मिळण्याचा एक मार्ग म्हणून ही बँक काढण्यांत आली. बँकेच्या नफ्याचा कांहीं भाग मंडळास अवश्यमेव दिला जातो. मंडळाच्या आणि बँकेच्याहि नियमाप्रमाणें, मंडळाला आपले दोन सभासद बँकेच्या मॅनेजिंग कमिटीवर पाठविण्याचा अधिकार आहे. १९३३ पासून १९४५ पर्यंत ही पद्धत व्यवस्थित चालू होती. ह्या दोन जागांसाठी पुढें बँकेनें निवडणूक करण्याचें ठरवून एका जागीं श्री. कुलकर्णी वकील ह्यांची निवड जाहीर केली. ही गोष्ट बेकायदा असून श्री. कुलकर्णी ह्यांस राजवाडे बँकेच्या मॅनेजिंग कमिटीवर काम करण्याची बंदी असावी असा हुकूम मिळण्यासाठी राजवाडे संशोधन मंडळानें धुळें जॉइंट सिव्हिल जज्जांच्या कोर्टांत दावा आणला होता. श्री. कुलकर्णी ह्यांचें नांव मंडळानें सुचविलेलें नसल्याकारणानें त्यांना मंडळाचे वतीनें बँकेवर येण्याचा अधिकार पोचत नाहीं, असा कोर्टानें निवाडा करून मागितलेलें इंजंक्शन दिलें.

### शेतकी कामासाठी ट्रॅक्टरः सहकारी संस्थांना कर्जें

मुंबई राज्यांतील बैलांची टंचाई भरून काढण्याच्या दृष्टीनें कांहीं विशिष्ट प्रकारच्या सहकारी संस्थांना शेतकी कामासाठी ट्रॅक्टर विकत घेण्याकरितां कर्जें देण्याचें मुंबई सरकारनें ठरविलें आहे. खरेदी व विक्री संस्था, विविध कार्यसंस्था, सहकारी शेतीसंस्था व तालुका सुधारणा संस्था यांना ट्रॅक्टरच्या किंमतीच्या ६० टक्के कर्ज देण्यांत येईल. हें कर्ज दरसाल दरशेंकडा ४ टक्के व्याजानें देण्यांत येणार असून तें वार्षिक हप्त्यांनीं फेडावयाचें आहे. सरकारच्या संमतीनें ट्रॅक्टर विकत घ्यावे लागतील आणि कर्ज पूर्णपणें फिटेपर्यंत ट्रॅक्टरची मालकी सरकारकडे राहील. 'अधिक धान्य पिकवा' मोहिमेस उत्तेजन देण्याच्या हेतूनें ही योजना हातीं घेण्यांत येत असून त्यानुसार सरकार ३१ मार्च, १९५१ पर्यंत ४,५०,००० रुपयांचीं कर्जें देणार आहे.


बेडेकर लोणचीं

दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड
हेड ऑफिस : पुणें शहर
शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर (बेलापूर रोड), ओझर (जि. नाशिक)
पे-ऑफिसः—खोपोली (जि. कुलाबा)
श्री. बी. बी. वाळवेकर (अध्यक्ष) | श्री. के. पी. जोशी (उपाध्यक्ष)

अधिकृत भांडवल रु. १५,४३,८१०
विक्री झालेलें भांडवल रु. ७,९३,८१०
वसूल भांडवल रु. ३,९८,२८५
एकूण खेळतें भांडवल ५३ लाखांचे वर

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.
श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर.

दि बँक ऑफ महाराष्ट्र लि
शेड्युल्ड बँक ★ स्थापना १९३५
वसूल झालेलें भांडवल रु. १६,००,०००
रिझर्व्ह व इतर फंड रु. ४,१०,०००
एकूण खेळतें भांडवल रु. २। कोटीचे वर
बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
बँकेनें कोल्हापूर व द. हैद्राबाद येथें शाखा उघडल्या असून त्या जोमांत सुरू आहेत.
मुख्य कचेरी लक्ष्मी रोड, पुणें २. | सी. व्ही. जोग मॅनेजर



हें पत्र पुणें, पेट भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.